# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २८/०९/२०२२ (बुधवार)**

**(सकाळ)**

---

### जबरी संभोग

**पो.स्टे. कुही :–** दिनांक २७/०९/२०२२ चे १७:३० वा. चे सुमारास आरोपी नामे– आशिष मंसारामजी वैरागडे वय २१ वर्ष रा. पांडेगाव याने फिर्यादी यांची मुलगी/पीडिता वय १५ वर्ष हिचे सोबत बळजबरीने शारीरिक संबंध प्रस्थापीत केले व घरी कोणाला सांगु नको तुने सांगीतले तर तुला मारीन अशी धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम ३७६,३७६(३),५०६ भादंवि. सहकलम ४, ६ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि सुचिता मंडवाले मो.क्र. ९७६३२३४५४८ या करीत आहे.

### अपघातात मृत्यु

**१) पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत १७ कि. मी. अंतरावरील कढोली येथे दिनांक २७/०९/२२ चे ०१.०० वा. ते ०५.०० वा. सुमारास फिर्यादी सरतर्फे सपोनि चौधरी हे नाईट ऑफिसर डयुटीवर असता माहीती मिळाली की, महामार्ग क्र. ५३ नागपुर ते भंडारा रांड महालगाव शिवारात जयस्वाल ढाबाजवळ व क्रिस्टल कंपनी जवळ एक इसम कढोली शिवारात नागपुर ते भंडारा रोडवरील कंपनीच्या समोरील रोडच्या बाजुला चित्त अवस्थेत होता. त्याची अंगझडती घेतली असता त्यामध्ये मोबाईल मिळाले. त्याचे मोबाईल चेक केले त्यामधुन त्याचे भावाचा नंबर मिळाला त्याचे भाउ नामे पुनचंद यास घटनेची माहीती दिली. तसेच जखमी हा क्रिस्टल कंपनी मध्ये काम करीत होता त्याचे नाव उत्तमकुमार हेमलाल फेकर(मृतक), वय ३७ वर्ष, रा. सेहा ता. बलारी जि. बलोदा बाजार असे असून त्यास जखमी अवस्थेत नागपुर ते भंडारा रोडवरील कंपनीच्या समोरील रोडच्या बाजुला उभा असता अज्ञात वाहनाने त्यास धडक मारली. सदर जखमीस फिर्यादीने मेयो हॉस्पीटल नागपुर येथे नेले असता तेथिल डॉक्टरांनी त्याला तपासून मृत घोषित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम ३०४ अ, २७९, १८४, १३४, १७७ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि अरविंद मोहोड मो.क्र. ९८२३९१०१५६ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कळमेश्वर** :— अंतर्गत चानविज कंपनीजवळ गोंडखैरी येथे दिनांक २७/०९/२२ चे २०.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— मुकेश कुमार प्रल्हाद पासवान, वय ३७ वर्ष, रा. चक अलाहदाद तह हाजीपूर जि. वैशाली राज्य बिहार ह. मु. शालीकराम अतकरी यांचे घरी किरायने गोंडखैरी वार्ड नं ०१ हे त्यांचे कंपनीचे गेट जवळ त्यांचे नौकरीवर हजर असतांना अचानक त्यांना जोराचा आवाज आला. त्यांनी तिथे जावून पाहीले असता एक अनोळखी इसम त्याची मोटरसायकल क्र. एमएच— ४०/जे— ०८७९ चे बाजुला रोडवर पडलेला दिसुन आला. त्याला अज्ञात वाहनाने धडक देत जखमी केले होते. त्याचे डोक्याला मार लागला असुन त्याचे डोक्यातुन रक्त निघत होते व तो जाग्यावरच मरण पावला होता. तपासादरम्यान मृतक हा सुभाष देवराव कोहळे, वय ४५ वर्ष, रा. सातनवरी असल्याचे निष्पन्न झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम ३०४ अ, २७९ भादवी सहकलम १३४, १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास ग्रेड पोउपनि हिवरकर मो.नं. ९८८१५९५९९९ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. पारशिवनी** :— अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील मौजा बाबुळवाडा शिवार सालई ते बिटोली पाईप लाइन रोड येथे दिनांक २७/०९/२२ चे १२.१५ वा. ते १२.२५ वा. सुमारास फिर्यादी नामे— आकाश ज्ञानेश्वर दिवटे वय ३२ वर्ष रा. सालई माहुली यांचा काका नामे— मुलचंद शेषराव दिवटे (मृतक), वय ५५ वर्ष रा. सालई माहुली हे आपले एम.एच— ४०/टी— ४१६९ क्रमांकाच्या सुपर स्पलेंडर मोटरसायकलने सालई वरून पारशिवनीला पाईपलाइन रोड ने येत असतांना एम.एच— ४०/सी.के— ८९१५ क्रमांकाचा हीरो स्पलेंडरचा चालक आरोपी नामे— कैलास तांडेकर, वय ३४ वर्ष, रा. सालई माहुली याने आपले ताब्यातील मोटरसायकल मनोज गोणेकर रा. सालई माहुली यास बसवुन आपली मोटरसायकल पारशिवनी कडुन सालई ला पाईपलाईन रोडने भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवित नेत असता फिर्यादीचे काकाच्या मोटरसायकला धडक दिली. या अपघातात त्यांचे डोक्याला व हातपायाला मार लागल्याने उपचारा करीता नागपुरला ॲम्बुलनसने नेत असतांना मरण पावले. आरोपी यांचे मोटरसायकल वर मागे बसलेला मनोज गोणकर किरकोळ जखमी झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सुरज शंकर ठाकरे, वय २८ वर्ष, रा. हिवरा हिवरी रामटेक यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपी चालकाविरुध्द कलम ३०४ अ, २७९ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा वरखडे ब.न ५०३ मो क्र ९७६३२१५४६५ हे करीत आहे.

**४) पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत १४ कि. मी. अंतरावरील रामटेक ते तुमसर रोड लोहारा फाटा येथे दिनांक २७/०९/२२ चे ०७.३० वा. ते १९.४५ वा. सुमारास फिर्यादी नामे— नरेंद्र भगवान कुशवाह, वय ४५ वर्ष, रा. बगनाह पोलीस स्टेशन कारकट ग्रोरादी जि. रोहतास राज्य बिहार व दिपक ज्ञानचंद कुशवाह (मृतक), वय ६० वर्ष, रा. सिवनी भोंडकी हे आपल्या एमएच—४०/एपी—८३५० क्रमांकाच्या होंडा लिओ कंपनीच्या वाहनाने रामटेक कडुन आपल्या राहते गावी शिवनी भोंडकी ला जात असतांना तुमसर कडुन रामटेक कडे येणारा लाल रंगाचा ट्रक ज्याचा क्र माहीत नाही च्या चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवु मोटरसायकला धडक दिली. या अपघातात मोटार सायकल चालक हा गंभीर जखमी होवुन जागीच मरण पावला तर पाठीमागे बसलेला फिर्यादी यास गंभीर जखमी करून घटनास्थळावरून पळुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपी चालकाविरुध्द कलम ३०४ अ, २७९, ३३७, ३३८ भादवी सहकलम १३४, १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि संजय खोब्रागडे मो क्र ९८९०२२२८४९ हे करीत आहे.

# अकस्मात मृत्यू

**१) पो.स्टे. बोरी :–** अंतर्गत येथे दिनांक २७/०९/२०२२ चे ०४.२० वा. दरम्यान फिर्यादी नामे– युसफ इब्राहीम शेख वय ४५ वर्ष रा. वार्ड क्र ४ बुटीबोरी व **वैभव देवराव सहारे(मृतक) वय २२ वर्ष रा सातगाव रिधोरी** हा कारमण्या टिचींग इंस्टीटयुट येथे नवरात्र निमीत्य मंडप डेकोरेशन तुरकमारी रोड वर गेट लावण्याचे काम करीत असता गेट वरती बॅनर लावण्याकरीता वरती चढला असता बाजुने गेलेली विदयुत तारेला त्याचा स्पर्श झाल्याने त्याला करंट लागुन वरून खाली पडला. त्यामुळे त्याच्या डोक्याला मार लागल्याने उपचारकामी त्यास माया हॉस्पीटल बुटीबोरी येथे भर्ती केले असता डॉक्टरांनी त्याला तपासुन मृत घोशीत कले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. बोरी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार पारधी मो.नं. ७७४१०२२७३१ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कुही :–** अंतर्गत नेवरी येथे दिनांक २०/०९/२०२२ चे १९.३० वा. दरम्यान **मनोज वासूदेव घुघुकसर (मृतक), वय ३२ वर्ष, रा. नेवरी** याने दारूच्या नशेत आपल्या राहते घरी पिकावर फवारणी मारण्याचे विषारी औषध स्वत: घेतल्याने त्याची प्रकृती खराब झाली. त्यास उपचाराकामी प्रथम पिएचसी कुही व नंतर नागपूर मेडीकल कॉलेज येथे दि.२१/०९/२०२२ चे ०५.४५ वा. भरती केले असता उपचारादरम्यान डॉक्टरांनी तपासुन दि.२४/०९/२२ चे १०.०० वा. मृत घोषीत केले. अश्या मेडीकल सुचनेवरून प्राप्त कागदपत्रावरून सदरचा मर्ग दाखल करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी पोहवा विकास बेलसरे मेडीकल पोलिस बुथ नागपूर यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कुही येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार सुधीर ज्ञानबोनेवार मो.क्र. ८६९८४०७११४ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**